शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.०२/२०२०

श्री.गोविंद मारूती अंबी } तक्रार अर्जदार

विरूध्द्

१. जयवंत प्रतिष्ठान हुमगाव, ता.जावळी, जि.सातारा
२. आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा, ता.जावळी, जि. सातारा. } वि.प.

श्री.संत गाडगेबाबा महाविद्यालय, कापशी, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर येथे सद्या कार्यरत असलेले सहा. प्राध्यापक श्री. गोविंद मारूती अंबी हे पुर्वी जयवंत प्रतिष्ठान हुमगाव, ता.जावळी, जि.सातारा यांचे आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा, ता.जावळी, जि. सातारा येथे कार्यरत होते. त्यांनी सदर महाविद्यालयाकडे केलेल्या कामाच्या अनुषंगाने तक्रार निवारण समितीकडे दि.०२/०९/२०२० रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

१. मी, श्री. गोविंद मारूती अंबी असून जयवंत प्रतिष्ठान हुमगाव, ता. जावळी, जि. सातारा संचलित आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा, ता.जावळी, जि.सातारा मध्ये दि.११/०८/२०११ पासून ते दि.०५/०३/२०१८ पर्यंत समाजशास्त्र या विषयाकरिता पुर्णवेळ या पदावर कार्यरत होतो. परंतू दि.२४/०१/२०१४ रोजी मला सदर महाविद्यालयाने दिलेल्या बेकायदेशीर सेवा समाप्ती संदर्भात दि.२४/०१/२०१४ ते १५/०९/२०१७ रोजी पर्यंत न्यायालयीन प्रक्रिया सुरू होती. त्यानंतर दरम्यानच्या कालावधीमध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार सदर महाविद्यालयामध्ये दि.१६/०९/२०१७ रोजी पासून मला माझ्या सेवेत पूर्वतत रूजू करून घेतले. परंतू सदर महाविद्यालयातून समाजशास्त्र या विषयाचा कार्यभार अतिरिक्त ठरल्याने मा.विभागीय सहसंचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, कोल्हापूर यांच्या दि. ०२/०२/२०१८ च्या पत्रानुसार व मा.सचिव, श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर यांच्या दि.२७/०२/२०१८ च्या समावेशन पत्रानुसार तसेच मा. प्राचार्य, आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा यांच्या दि.०५/०३/२०१८ च्या दिलेल्या कार्यमुक्ती आदेशानुसार सदर महाविद्यालयातून कार्यमुक्त होऊन दि.०६/०३/२०१८ रोजी श्री. संत गाडगेबाबा महाविद्यालय, शाखा कापशी, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर येथे रूजू झालो. परंतू आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा मध्ये दि.१६/०९/२०१७ रोजी पासून मला माझ्या सेवेत पूर्वतत रूजू करून घेतले पासून ते दि.०५/०३/२०१८ पर्यंत समाजशास्त्र या विषयाचा कार्यभार

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर

अतिरिक्त ठरल्याने कार्यमुक्त होईपर्यंतच्या कालावधी मधील ५ महिने २० दिवसाचे एकूण रक्कम रूपये ३,७०,८०१/- इतके वेतन अद्याप दिलेले नाही. या संदर्भात सदर महाविद्यालयास वेळोवेळी तोंडी व लेखी पत्रव्यवहार करून विनंती केली असून अद्याप मला माझ्या सेवेचे वेतन मिळालेले नाही.

२. तसेच मी समाजशास्त्र या विषयातील एम.फिल या पदवीकरीता शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे शैक्षणिक वर्ष २००८-०९ या कालावधीमध्ये प्रवेश घेतला होता. सदर महाविद्यालयामध्ये सेवेत असताना एम.फिल ही पदवी मी दि.२१ ऑगस्ट, २०१३ रोजी मा.उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या दि.१३ ऑगस्ट, २०१३ च्या पत्रानुसार संपादन केली आहे. तेंव्हा ऑक्टोंबर २०१३ ते जूलै २०१९ पर्यंतच्या कालावधीमधील एम.फिल पदवी वेतन वाढीचा फरक एकूण रक्कम रूपये १,२२,६८९/- अद्याप मिळालेला नाही.

३. तसेच मी दि.११/०८/२०१६ रोजी वरिष्ठ वेतन श्रेणीसाठी पात्र ठरलो आहे. परंतू सदर महाविद्यालयाने दि.२४/०१/२०१४ रोजी दिलेल्या बेकायदेशीर सेवा समाप्ती विरोधात दि.२४/०१/२०१४ ते दि.१५/०९/२०१७ रोजी पर्यंत न्यायालयीन प्रक्रिया सुरू होती. त्यामुळे सदर वरिष्ठ वेतन श्रेणीसाठी आवश्यक असणारे प्रबोधन वर्ग व उजळणी वर्ग सदर कालावधीमध्ये मला पुर्ण करता आले नाहीत. तसेच सदर महाविद्यालयामध्ये पूर्वतत रूजू झाल्यानंतरही सदर वरिष्ट वेतन श्रेणीसाठी आवश्यक असणारे प्रबोधन वर्ग व उजळणी वर्ग यासाठी लागणारी परवानगी मागितली असता सदर महाविद्यालयाने मला ती नाकारली सबब मला आवश्यक असणारे प्रबोधन वर्ग व उजळणी वर्ग पुर्ण करता आले नाहीत. परंतू मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी सदर सेवा समाप्ती कालावधी हा सेवा कालावधी म्हणून ग्राहय धरावा असा आदेश कला आहे. तरी मी सदर वरिष्ठ वेतन श्रेणीसाठी आवश्यक असणारे प्रबोधन वर्ग व उजळणी वर्ग जानेवारी २०२० मध्ये पूर्ण केले आहेत. तेंव्हा माझी वरिष्ठ वेतन श्रेणी ही दि.११/०८/२०१६ पासून ग्राहृय धरण्यात यावी ही विनंती.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

महाविद्यालयाने दि.०६/१२/२०२१ रोजीच्या पत्राने श्री.अंबी हे सदर महाविद्यालयात कोर्ट आदेशानुसार दि.१६/०९/२०१७ पासून महाविद्यालयात हजर झाले त्यावेळी मा.विभागीय सहसंचालकसो, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचेकडे वेतनासंदर्भात केलेला पत्रव्यवहार व मा.कुलगुरू शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडे समाजशास्त्र विषयाचा कार्यभार नसल्यामुळे श्री.अंबी गोविंद मारूती यांचे पद अतिरिक्त होत असल्याबाबतचा केलेला पत्रव्यवहार सोबत जोडले आहे.

**समितीची निरिक्षणे :**

१. तक्रारदार यांनी आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा यांचेकडील दि.१६/०९/२०१७ ते दि.०५/०३/२०१८ पर्यंतच्या ५ महिने २० दिवसाचे वेतन मिळालेले नाही. तसेच या संदर्भात सदर

महाविद्यालयास वेळोवेळी तोंडी व लेखी पत्रव्यवहार करून विनंती केली आहे परंतू अद्याप माझ्या सेवेचे वेतन मिळालेले नसल्याची तक्रार नमूद केली आहे.

संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांच्या तक्रारीच्या कालावधीमधील वेतनाबाबतचा प्रस्ताव त्यावेळी सहसंचालक कार्यालयाकडे पाठविलेला असल्याचे समितीसमोर कथन केले. तसेच याबाबत सहसंचालक कार्यालयाकडे केलेल्या पत्रव्यवहाराची कागदपत्रे समितीसमोर सादर केली.

महाविद्यालयाने दि.०६/१२/२०२१ रोजीच्या पत्रासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरून समितीच्या असे निदर्शनास येते की, तक्रारदार यांना मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महाविद्यालयात हजर करून घेतलेल्या तारखेपासून वेतन देयकामध्ये नाव समाविष्ठ करून वेतन सुरू करणेबाबत मा.विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर यांचेकडे सदर महाविद्यालयाने पत्रव्यवहार केलेला दिसून येतो. तसेच सहसंचालक कार्यालयाकडून तक्रारदार यांचे वेतन देयकात नाव समाविष्ट करणेकामी प्रस्तावातील त्रुटी पुर्तता करणेबाबत महाविद्यालयास पत्रव्यवहार केलेचे व या अनुषंगाने महाविद्यालयाकडून त्रुटी पुर्तता केलेबाबतचे सहसंचालक कार्यालयास सादर केलेले पत्र दिसून येते. तथापी सदरचा पत्रव्यवहार हा सन २०१७ मधील आहे व त्यानंतर पुढील कालावधीत संबधित महाविद्यालयाने याबाबत वेळोवेळी सहसंचालक कार्यालयाकडे पाठपुरावा केल्याचे दिसून येत नाही. याबाबत तक्रारदार यांनी संस्थेकडे पाठपूरावा करणे आवश्यक होते असे महाविद्यालयाकडून कथन करण्यात आले. याबाबत तक्रारदार यांनी आपण वेळोवेळी संस्थेकडे पत्राव्द्वारे मागणी केली असल्याचे कथन करण्यात आले.

उपरोक्त दोन्ही पक्षकारांचे म्हणणे विचारार्थ घेता समितीचे मत असे की, मा. उच्च न्यायालयाने तक्रारदार यांना सेवासातत्य व वेतन देणेबाबत आदेश केले असलेने त्यांची सेवा ग्राहय धरून शासनाने त्यांचे अधिव्याख्याता पद अतिरिक्त झाल्याने दुसऱ्या महाविद्यालयामध्ये समावेशन केले आहे. दि.१६/०९/२०१७ ते दि.०५/०३/२०१८ पर्यंतच्या कालावधीमधील वेतनाबाबत सदर संस्था व महाविद्यालयाने सहसंचालक कार्यालयाकडे पत्रव्यवहार केलेला दिसून येतो. परंतू त्याबाबत संबधित कार्यालयाकडे महाविद्यालयाने वेळोवेळी योग्य तो पाठपुरावा करून तक्रारदार यांच्या थकीत वेतनाबाबतची कार्यवाही करणे आवश्यक असताना संस्था व महाविद्यालयाने ती केलेली नसल्याचे दिसून येते. सबब संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांच्या वेतनाबाबत सहसंचालक कार्यालयाकडे आवश्यक तो पाठपुरावा तात्काळ करून तक्रारदार यांचे सदर कालावधीमधील थकीत वेतनाबाबतची योग्य ती कार्यवाही करणे जरूरीचे आहे.

२. तक्रारदार यांनी तक्रार अर्जामध्ये आपण सदर महाविद्यालयामध्ये सेवेत असताना एम.फिल ही पदवी दि.२१ ऑगस्ट, २०१३ रोजी मा.उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या दि.१३ ऑगस्ट, २०१३ च्या पत्रानुसार संपादन केली आहे. तेंव्हा ऑक्टोंबर २०१३ ते जूलै २०१९ पर्यंतच्या कालावधीमधील एम.फिल पदवी वेतनवाढीचा फरक एकूण रक्कम रूपये १,२२,६८९/- अद्याप मिळालेला नाही अशी तक्रार नमूद केली आहे.

तक्रारदार यांनी या तक्रारीबाबत त्यांनी सन २०१३ मध्ये एम.फिल पदवी धारण केली असल्याने त्यांना वेतनवाढ देय होत असल्याच्या पुष्ठार्थ नियम जोडलेले नाहीत. तथापी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नता १ विभाग यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहाव्या वेतनआयोगानुसार दि.१२/०८/२००९ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतूद अवलोकनी घेतली असता, (ii) M.Phil. degree holders at the time of recruitment to the post of Assistant professor shall be entitled to 2 non- compounded advance increments.

उपरोक्त तरतूदींच्या अनुषंगाने तक्रारदार यांनी धारण केलेल्या एम.फिल. पदवीचा कालावधी विचारात घेता, सदरची तरतूद तक्रारदार यांना लागू होत नाही या निष्कर्षापर्यंत समिती येते. सबब तक्रारदार यांची सदरची मागणी समितीस मान्य करता येणार नाही.

३. तक्रारदार यांनी दि.११/०८/२०१६ रोजी वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी पात्र ठरलो आहे. परंतू सदर महाविद्यालयाने दि.२४/०१/२०१४ रोजी दिलेल्या बेकायदेशीर सेवा समाप्ती विरोधात दि.२४/०१/२०१४ ते १५/०९/२०१७ रोजी पर्यंत न्यायालयीन प्रक्रिया सुरू होती. त्यामुळे सदर वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी आवश्यक असणारे प्रबोधन वर्ग व उजळणी वर्ग सदर कालावधी मध्ये पुर्ण करता आले नाहीत. तसेच सदर महाविद्यालयामध्ये पुर्ववत रूजू झाल्यानंतरही सदर वरिष्ठ वेतन श्रेणीसाठी आवश्यक असणारे प्रबोधन वर्ग व उजळणी वर्ग यासाठी लागणारी परवानगी मागितली असता सदर महाविद्यालयाने मला ती नाकारली सबब मला आवश्यक असणारे प्रबोधन वर्ग व उजळणी वर्ग पुर्ण करता आले नाहीत. परंतू मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी सदर सेवा समाप्ती कालावधी हा सेवा कालावधी म्हणून ग्राहय धरावा असा आदेश कला आहे. तरी मी सदर वरिष्ठ वेतन श्रेणीसाठी आवश्यक असणारे प्रबोधन वर्ग व उजळणी वर्ग जानेवारी २०२० मध्ये पूर्ण केले आहेत. तेंव्हा माझी वरिष्ठ वेतनश्रेणी ही दि.११/०८/२०१६ पासून ग्राहय् धरण्यात यावी अशी तक्रार नमूद केली आहे.

तसेच तक्रारदार यांनी दि.०३/०२/२०२२ रोजीच्या दिलेल्या लेखी म्हणण्यामध्ये शिवाजी विद्यापीठाने दि.११/०१/२०२२ ते दि.२५/०१/२०२२ रोजीच्या स्थाननिश्चिती शिबीरामध्ये वरिष्ठ वेतन श्रेणीसाठी अर्ज केला असता स्थाननिश्चिती समितीने आपण वरिष्ठ वेतन श्रेणीसाठी पात्र असलेली दि.११/०८/२०१६ रोजीची तारीख ग्राहूय न धरता आपले उजळणी कोर्स पुर्ण झालेली तारीख दि.२७/०१/२०२० ही तारीख ग्राहूय धरून दि.२८/०१/२०२० पासून पुढील पदोन्नतीचे लाभ दिले आहेत. तथापी सदरची तारीख दि. ११/०८/२०१६ पासून ग्राहय धरून तेथून पुढील पदोन्नतीचे सर्व लाभ मिळावेत अशी मागणी केली आहे.

याबाबत समितीचे मत असे की, शिक्षकांच्या कॅस बाबतची प्रक्रिया शासन निर्णयानुसार होते. युजीसी तसेच शासन निर्णयानुसार कॅस समिती गठीत असते. कॅस समितीमध्ये शासन प्रतिनिधी असतात. कॅस समितीकडून याबाबतच्या निर्णयांचे कामकाज केले जाते. सबब तक्रारदार यांची कॅस बाबतची मागणी तक्रार

निवारण समितीच्या कार्यकक्षेत येत नसल्याने ती समितीस मान्य करता येणार नाही. तसेच याबाबत तक्रारदार यांनी योग्य त्या ठिकाणी दाद मागणे उचित होईल.

४. तक्रारदार यांनी तक्रार अर्जात नमूद केलेल्या तक्रारी व्यतिरिक्त सदर महाविद्यालयाकडून सेवा पुस्तकातील अपूर्ण नोंदी पुर्ण न करून दिलेबाबतची तक्रार समितीसमोर मांडली आहे. याबाबत समितीने संबधित संस्था व महाविद्यालयास याबाबत योग्य ती कार्यवाही करणेची सुचना केली होती. सदर महाविद्यालयाकडून त्याबाबत सेवापुस्तकातील नोंदी पुर्ण करून दिलेल्या असल्याचे कथन करण्यात आले. तथापी तक्रारदार यांनी आपल्या वैद्यकिय रजेबाबतच्या काही नोंदी अपुर्ण असल्याचे समितीसमोर कथन केले. त्या अनुषंगाने संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांच्या उपलब्ध असणा-या रेकॉर्डनुसार सेवापुस्तकातील रजेच्या नोंदी बाबतची योग्य ती कार्यवाही करावी. सबब समिती खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांच्या दि.१६/०९/२०१७ ते दि.०५/०३/२०१८ पर्यंतच्या थकीत वेतनाबाबत सहसंचालक कार्यालयाकडे योग्य तो पाठपूरावा करून तक्रारदार यांचे वेतनाबाबतची योग्य ती कार्यवाही तात्काळ करावी.

२. तक्रारदार यांच्या तक्रार अर्जातील कं. २ व ३ ची तक्रार अमान्य करण्यात येत आहे.

३. संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांच्या उपलब्ध असणाऱ्या रेकॉर्डनुसार सेवापुस्तकातील वैद्यकिय रजेच्या नोंदीबाबतची योग्य ती कार्यवाही करावी.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधितांना देवून तसे कळविण्यात यावे.

दिनांक : 2 3 AUG 2022

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(डॉ. एन.बी.गायकवाड)

सदस्य
(श्री.ए.ए.कुलकर्णी)

सदस्य
(डॉ.एस.एस.महाजन )

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए. कदम)

अध्यक्ष
(श्री. एस.पी.कुलकर्णी)